||नहि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्त||

छत्रपती शिवाजी शिक्षण मंडळाचे

# कला व वाणिज्य महाविद्यालय वडूज

ता. खटाव जि. सातारा



## सहल विभाग

## विषय :- स्मारकांचे जतन व संवर्धन

१) कांबळे अंकित सुनिल रोल नं. ५६३

**पर्यवेक्षक**

प्रा. घार्गे सर व गुजर सर.

**अधिव्याख्याता**

कला व वाणिज्य महाविद्यालय, वडूज

सन २०१६-१७

# अनुक्रमणिका


| अ.क्र | बिषयसुची |
|---|---|
| १ | मुखपृष्ठ |
| २ | प्रमाणपत्र |
| ३ | उद्दिष्टे |
| | गृहितके |
| | स्मारकांचे जतन व संवर्धन |
| ६ | आभार |


Smart PAPER

Rajdhani

Scanned with CamScanner

# प्रस्तावना

इतिहासाचे कागदपत्रे, चित्रे व स्मारके यांना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. पुराभिलेखा, ग्रंथालये, प्राचीन लेणी, मंदिरे, मशिदी, किल्ले, वाडे, समाधी स्थळे, स्मारके, ऐतिहासिक घटनांची ठिकाणे इत्यादी घटक पर्यटक व संशोधकांच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. पर्यटक अशा अनेक ठिकाणांना भेटी देतात. त्यांचा अभ्यास करतात, इतिहास जाणून घेतात. इतिहासाचा हा अनमोल ठेवा आपणासाठी आणि पुढील पिढ्यांसाठी जपण्याची आज गरज निर्माण झाली आहे.

कागदपत्रे, चित्रे व स्मारके यांचे जतन व संवर्धन गरजेचे आहे. 'जतन' या संकल्पनेमध्ये वस्तूची भौतिक व रासायनिक स्थिती मजबूत करण्याचा प्रयत्न केला जातो. ही प्रक्रिया पुन: पुन्हा करणे आवश्यक ठरते. 'संवर्धन' या संकल्पनेमध्ये वस्तूंचे स्वरूप व गुणधर्म जाणून घेणे. त्यांना होणारा अपकर्ष/ऱ्हास ~~समज~~ समजून घेणे आणि

# प्रस्तावना

वस्तूंचे अपकर्षापासून बचाव करणे या बाबी संवर्धनामध्ये महत्त्वाच्या ठरतात. कागदपत्रे, चित्रे व स्मारके यांच्या अपकर्षासाठी, जे घटक कारणीभूत ठरतात यामध्ये मानवनिर्मित घटक व जैविक घटक यांचा समावेश होतो. मानवनिर्मित घटकांमध्ये वस्तूंची अयोग्य पद्धतीने केलेली हाताळणी नागरिकांच्या अज्ञानाने झालेला विकास व दळणवळण यामुळे बसणारे हादरे व आग-वणवे हे घटक मोडतात. तर नैसर्गिक घटकांमध्ये हवामान, पूर, प्रकाश, प्रदूषण, वादळ, जमिनीतील क्षार, पाणी यांचा समावेश होतो. तसेच बुरशी, कसर, कीटक, वाळवी या जैविक घटकांचाही समावेश होतो. आज वस्तूंचा अपकर्ष रोखण्यासाठी उपाययोजना करणे आवश्यक बनले आहे. तरच हा अनमोल ठेवा जपला जाईल.

जन्म इ. स १९ फेब्रुवारी १६३०

छत्रपती शिवाजी महाराज (१९ फेब्रु १६३० ते ३ एप्रिल १६८०)

तमाम मराठी मनाचा मानबिंदू, सह्याद्रीच्या माथ्यावर वर्षानुवर्षे तळपणारा क्रांतिसूर्य राष्ट्रमाता जिजाऊ भोसले यांनी स्वराज्याला अर्पण केलेले युगपुरुष श्री छत्रपती शिवाजी महाराज॥

किल्ले शिवनेरीवर राजमाता जिजाऊ साहेबांच्या पोटी जन्मलेला हा स्वराज्यसूर्य, स्वराज्य संकल्पक शहाजी महाराज साहेब यांच्या आशीर्वादे माळी बाळगत उद्याच्या महाराष्ट्राचे दैवत बनला. छत्रपती शिवरायांचा जन्म किल्ले शिवनेरीवरचा. ~~किल्ला~~ किल्ल्याची गडदेवता शिवाईदेवीच्या नावावरून महाराजांचे नाव शिवाजी ठेवण्यात आले. महाराजांचे बालपण शिवनेरी आणि पुणे सुभा यामध्ये झाले.

युद्धाभ्यास आणि रणनीती तसेच राजकारभार ह्यासंबंधी प्राथमिक मार्गदर्शन त्यांना शहाजीराजांकडून तर परकीय सत्तेविरुद्ध लढा करण्याकरता आवश्यक असलेल्या

शिस्तीचे शिक्षण जिजाबाईकडून
मिळाले असे उपलब्ध ऐतिहासिक
माहितीवरून निश्चितपणे सांगता येते
मावळ खोऱ्यातील मावळ्यांना सोबत
घेऊन स्वराज्य स्थापनेची शपथ घेऊन
इ.स १६४७ मध्ये सतरा वर्षांच्या शिवाजी
राजांनी आदिलशाहच्या ताब्यातला तोरणा
जिंकला आणि स्वराज्याची मुहूर्तमेढ
रोवली. तोरणागड हे स्वराज्याचे तोरणच
ठरले. त्याच साली शिवाजीराजांनी
कोंढाणा (सिंहगड) आणि पुरंदर हे किल्ले
आदिलशाहाकडून जिंकून हळूहळू पुणे
प्रांतावर पूर्ण नियंत्रण मिळवले.
विद्वान विदग्ध ज्यांचे गुण आणि कार्य
अबाधित आहे असे आपले छत्रपती शिवाजी महाराज
आजही ज्यांची शिवनीति भरपूर काही
शिकवून जाते असे आपले छत्रपती
शिवाजी महाराज विचार केला. तर आयुष्याच्या
प्रत्येक घडामोडीत आपल्याला मार्गदर्शक
ठरेल अशी आपल्या महाराजांची शिवनीति.
आपल्या शिवरायांचे चरित्र।।
~~अस्त~~ अशा ह्या स्वराज्याच्या सूर्याचा
अस्त ३ एप्रिल १६८० रोजी रायगडावर झाला.
रायगडावर महाराजांची समाधी जगदीश्वर
मंदिरा शेजारी आहे.

Scanned with CamScanner

# छत्रपती संभाजीराजे भोसले

जन्म १४ मे १६५७- मृत्यु: ११ मार्च इ.स १६८९

संभाजी महाराजांचे पूर्णच आयुष्य अनेक बादशहांनी घेरलेले होता.... परंतु अशा सगळ्याच बादशहांना कायम झुंज देत ते लढत राहिले.... म्हणूनच इतिहास त्यांना, "सर्जा" आणि "रौद्रशंभू" सारख्या नावांनी ओळखतो.

शिवराय आणि सईबाईंच्या संसारवेलीवर शंभू नावाचे 'सूर्यफूल' जन्माला आले. हे त्यांना सूर्यफूलच म्हणावे लागेल. कारण, त्यांच्यात जशी सूर्याची आग आणि तेजस्वीपणा होता, तसेच फुलासारखे कोमल कवीचे हृदय कविमन सुद्धा होते. असे हे सूर्यफूल अजाणतेपणाच्या वयातच आपल्या आईच्या मायेला पारखे झाले. हा होता नियतीच्या पहिला आघात. जिजाऊ मासाहेबांच्या छत्रछायेखाली आणि शिवरायांच्या महाराजांच्या सोबतीत शंभूराजे मोठे झाले.

छत्रपतींचेच संस्कार त्यांच्यावर झाले
मग मावळ्यांच्या सोबतीला ते कसे
पारखे होतील ??? बालपणापासूनच
शंभूराजेंना. रयतेची मावळ्यांची ओढ
होती. त्यामुळेच राख्या महाराष्ट्राशी
जिवलगा दिलेर हुशार मावळे सोबत्यातून
त्यांनी निवडले होते.
वाचल्याप्रमाणे तिप्पट वेगाने
कळणे आणि मैत्री शंभूराजे ~~[illegible]~~ होते.
ज्या वयात मुलं खेळ आणि वाचन
मध्ये रमतात
@भारगया।

# स्मारकांचे जतन व संवर्धन

स्मारके ही इतिहासाची मूक साक्षीदार असतात. ऊन, वारा, पाऊस अशा कोणत्याही गोष्टींची तमा न बाळगता अनेक स्मारकांचे अस्तित्व टिकून आहे. अशा स्मारकांपासून स्फूर्ती प्रेरणा घेऊन मानव भविष्यकालीन जीवनाची वाटचाल सुकर करण्याचा प्रयत्न करत असतो. स्मारकांमध्ये मंदिर, पुतळे, समाध्या, स्तंभ आदी घटकांचा समावेश होतो. सुख-दुःख, विजयाचे प्रतीक किंवा आधी घटनांची स्मृती चिरंतन रहावी यासाठी स्मारके उभारली जातात. अशी स्मारके प्रामुख्याने दगडांपासून बनवलेली असतात. शिवाय काही स्मारके अनेक धातूंपासून निर्माण केलेली असतात. अशा स्मारकांचा निसर्ग निर्मित कारणांबरोबर मानवनिर्मित कारणांमुळे ह्रास / अपकर्ष होत असतो. जगातील प्रत्येक वस्तूवर, घटकांवर केव्हा ना केव्हा विनाश ओढवणार असतो. हे तत्व मान्य केले तरी योग्य जतन व संवर्धन करून (त्याच्या वस्तूचे घटकाचे दीर्घायुष्य नक्कीच वाढवता येते.

स्मारक ज्या ठिकाणी असेल त्या प्रदेशातील वातावरणाचा स्मारकावर नक्कीच परिणाम होत असतो. उदा. वायुप्रदूषणामुळे निर्माण झालेल्या दूषित वातावरणाचा परिणाम ताजमहालावर दिसू लागला आहे. स्मारकांचे मोठे-मोठे मूळ भाग असलेले ठिकाणापासून तेथे निर्माण केलेल्या प्रदर्शन करायच्या ठिकाणी नेत असताना हादरे बसून त्यास तडे जाऊ शकतात. तेव्हा अशा वस्तू फुटणार नाहीत, त्यास तडे जाणार नाहीत यासाठी त्यांची आवश्यक त्या साधनांमध्ये पॅकींग/बांधणी करून त्याची वाहतूक करावी. नाही म्हटले तरी ऊन, वारा, पाऊस यांचा स्मारकांवर प्रभाव पडत असतो. तेव्हा ऊन, वारा, पाऊस यांपासून स्मारकांचे संरक्षण होईल अशी व्यवस्था करावी. स्मारकांची स्वच्छता करताना योग्य त्या शास्त्रीय पद्धतीचा अवलंब करावा. अनावश्यक रासायनिक घटकांचा वापर शक्यतो टाळावा. मोठ-मोठ्या पुरामुळे नदीकाठी असलेल्या स्मारकांना, पुतळ्यांना, मंदिरांना धोका उत्पन्न होऊ शकतो.

तेव्हा स्मारके ही सुरक्षित ठिकाणी असावीत.

स्मारके नष्ट होण्याचे आणखी मुख्य महत्त्वाचे कारण म्हणजे धर्मा-धर्मातील जाती-जातीतील कलह किंवा संघर्षाला ही स्मारके बळी पडतात. भावी भारताच्या मुख्य सुजाण नागरिक म्हणून स्मारकांचे रक्षण, जतन व संवर्धन करण्याची प्रत्येकाचीच जबाबदारी आहे. असे झाले तरच ही स्मारके चिरंतन काळासाठी स्फूर्ती व प्रेरणा देत राहतील शिवाय पर्यटनाला चालना मिळून अर्थव्यवस्था बळकट करण्यासाठी साहाय्यभूत ~~होत~~ ठरतील.

# आभार

सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून बी.ए भाग ३ या वर्षासाठी इतिहास अभ्यास या विषयांतर्गत विषय प्रकल्प करण्याची संधी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांचे आम्ही ऋणी आहोत.

विषय प्रकल्प करत असताना विषय निवडीचे स्वातंत्र्य, प्रत्येक प्रश्नासाठी योग्य मार्गदर्शन व सातत्याने प्रोत्साहन दिल्याबद्दल माननीय प्राचार्य श्री. जाधव. एम. जी ~~साची~~ यांचा मी आभारी आहे.

या विषय प्रकल्पादरम्यान योग्य मार्गदर्शन करणारे आणि पूरक माहिती देणारे विषय प्रकल्पाचे प्रा. श्री. घार्गे आर. एम व गुजर डी. बी तसेच प्रकल्पासाठी आवश्यक ती माहिती देणारे विषय क्षेत्रातील सहकारी यांचे मनापासून आभारी आहोत.

महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक प्रशासकीय वर्ग यांच्या सहकार्याबद्दल व अक्षदा कॉम्प्युटर वडूज यांनी प्रकल्पाच्या दर्जेदार छपाई कामी केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांची आभारी आहे.

स्थळ - कला व वाणिज्य महाविद्यालय, वडूज

दिनांक - ८/२/१८